देवदासी : एक सामाजिक समस्या

अरुण विठ्ठल पौडमल
(असि. प्रोफेसर) समाजशास्त्र विभाग प्रमुख यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेज, कोल्हापूर 416 002, महाराष्ट्र

1. प्रस्तावना

देवदासी म्हणजे लहान वयातच देवदेवतांच्या सेवेसाठी सोडलेल्या मुली होय. खंडोबाच्या नावाने सोडलेल्या मुलींना मुरळ्या म्हणतात. मंगेशाच्या नावाने सोडलेल्या मुलींना भाविणी, मातंगीच्या उपासिका तसेच दक्षिण महाराष्ट्रातील यल्लमाच्या जोगिणी या नावाने देवदासी ओळखल्या जातात. ही प्रथा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. हाच मानव समाजाला लागलेला एक कलंक आहे.

2. उद्दिष्ट्ये

सदर शोध निबंधाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे नमूद केलेली आहेत.

2.1 देवदासी पद्धत काय आहे याचा इतिहास पाहणे.
2.2 देवदासींचा सामाजिक, आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.
2.3 देवीला सोडलेल्या मुलींचे अस्तित्व व प्रथेचे स्वरूप पाहणे.
2.4 देवदासींच्या समस्यांचा अभ्यास करणे.

3. प्रमुख कारणे

3.1 देवदासी डोक्यातील केसांच्या जटा वाढविणे.
3.2 मुलं–बाळं होण्यासाठी देवीला नवस बोलणे.
3.3 रोगांपासून संरक्षण व्हावे किंवा तो बरा व्हावा म्हणून नवस बोलणे.
3.4 आपल्या कुटुंबाची परंपरा कायम ठेवणे.
3.5 कष्ट न करता आर्थिक फायदा करून घेणे.

4. देवदासींच्या समस्या

देवदासी ही प्रथा मानवी समाजाला लागलेले एक ग्रहण आहे. यल्लमाशी (देवीशी) मुलीचे लग्न लावून दिले जाते. एकदा का मुलीचे लग्न लावून दिले की त्या मुलीला दुसरा विवाह कायदेशीर करता येत नाही. तिला देवीच्या नावावर पोट भरावे लागते. गावोगावी यल्लमाचा जग घेऊन भटकावे लागते. लहान वयातच त्यांना ही कामे करावी लागतात. परंतु देवदासी जर वयात आल्यावर तिच्या खऱ्या अर्थाने शोषणाला सुरुवात होत असते आणि अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते.

1. आर्थिकदृष्ट्या मागासलेपणा एक समस्या

आर्थिकदृष्ट्या मागासलेपणा ही अत्यंत महत्त्वाची समस्या आहे. अनुसूचित जातीतील मुलगी मोठ्या प्रमाणात देवदासी असल्याचे दिसते आहे. घरची गरिबीची परिस्थिती असल्यामुळे मुलीला सांभाळणे त्यांना जमत नाही म्हणून त्या देवदासी देवीच्या नावाने जोगवा मागून पोट भरतात. त्यातून जे त्यांना मिळते त्यामध्ये त्यांचे पोटदेखील भरत नाही. म्हणून त्यांना सुरुवातीला देहविक्री करावी लागते व शेवटी वेश्या व्यवसाय करूनच देवदासीला आपले पोट भरावे लागते. समाजसुद्धा देवदासीला उपभोगाचे साधन म्हणूनच तिला पहातो व तिचा उपयोग करून घेतो. यातूनच समाज तिचे आर्थिक, सामाजिक व नैतिक शोषण करतो. हे सर्व अनैतिक मानले जात नाही.

2. पुरुष (झुलवा) प्रथा एक समस्या

देवदासीची काळजी घेणारा पुरुष (झुलवा) तिला पाहिजे असतो. तो तिचा पती असत नाही तर तिची काळजी घेणारा समजला जातो. त्यानंतर ती देवदासी दुसरा–तिसरा पुरुष (झुलवा) करते आणि कालांतराने ती आपोआप वेश्या व्यवसायाकडे वळते. या प्रथेमुळे देवदासींच्या बाबतीतच नव्हे तर तिच्यापासून जन्मलेल्या मुलांच्या जीवनात त्या मुलांचा काही दोष नसतानासुद्धा त्यांना समाजात गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागते. कारण यातून जन्मलेल्या मुलांना समाजात कायदेशीर हक्क/दर्जा मिळत नाही. ही मोठी समस्या मानली जाते.

3. म्हातारपणातील/वृद्धापकाळातील समस्या

देवदासी ही त्या कुटुंबाचे आर्थिकदृष्ट्या कमावती स्त्री म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. जोपर्यंत ती तरुण आहे तोपर्यंत तिच्या जीवावर घरातील सर्वजण मजा करीत असतात. ऐश करीत असतात. परंतु ती वृद्ध झाली की तिचे उत्पन्न थांबते. ती जोगवा मागू शकत नाही किंवा वेश्या व्यवसाय करू शकत नाही. तिला तिचे शरीर साथ देत नाही. अशा वेळेला घरातील सर्व मंडळी तिच्याकडे ढुंकूनसुद्धा बघत नाहीत व म्हातारपणी तिची कोणीही काळजी घेत नाही. उपासमारीची वेळ तिच्यावर येते व ती भीक मागून जगते आणि बेवारस म्हणून तिला मरावे लागते.

4. देवदासीची मुले एक गंभीर समस्या

देवदासीची मुले नेमकी कोणत्या पुरुषाची आहेत हे देवदासीला सांगता येत नाही. बीन बापाची मुलं म्हणून समाज त्यांच्याकडे पहातो. त्या मुलांना वडिलांऐवजी आईचेच नाव लावावे लागते. या मुलांना कोणताही हक्क/अधिकार मिळत नाही. समाजात त्यांना चांगली वागणूक मिळत नाही. अपमानाची वागणूक दिली जाते. अशा मुलांना विवाह करताना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे ही मोठी समस्या निर्माण होते.

5. वेश्या व्यवसाय (देवदासी) एक समस्या

पैसा मिळविण्याचा सोपा मार्ग म्हणून आता मुली देवीला सोडल्या जातात. कमी श्रमात जास्त पैसा मिळतो. म्हणजे देहविक्री करून पैसा मिळविला जातो. पूर्वी देवीची सेवा करण्यासाठी मुली सोडण्याची प्रथा होती. परंतु आज तिचे स्वरूप बदलले आहे. गरिबी असलेल्या मागासवर्गीय जातीतील मुली मोठ्या प्रमाणात देवदासी म्हणून सोडल्या जातात. महाराष्ट्र कर्नाटक राज्यातून जास्त प्रमाणात मुली पाठविल्या जातात. मोठ–मोठ्या शहरांमध्ये कुंटणखान्यात या मुलींना पाठविले जाते व त्यांचा आर्थिक मोबदला मिळविला जातो. मुलींची इच्छा असो अगर नसो आई–वडिलांच्या मर्जीने त्या या व्यवसायाकडे वळतात. म्हणजे आई–वडीलच या मुलींचे वाटोळे करतात व देवदासी वेश्या व्यवसायास प्रवृत्त होते.

6. रोग–राईची समस्या

देवदासी ही वेश्या व्यवसाय करू लागल्या नंतर तिला अनेक रोगांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये टी. बी., गुप्तरोग, एड्स या सारख्या महाभयानक रोगांचे ती शिकार बनते किंवा या रोगांना बळी ठरते. मुळातच देवदासी ही यल्लमाचे, खंडोबाचे, मंगेशाचे, मातंगीचे दासी म्हणूनच ओळखली जाते. तरीसुद्धा समाज तिला उपभोगाची वस्तू म्हणूनच तिच्याकडे पहात असतो आणि हे सर्व अनैतिक मानलेच जात नाही. देवदासीचे आर्थिक आणि सामाजिक शोषण होत असल्यामुळेच ती वेश्या व्यवसायाकडे वळते आणि अनेक प्रकारच्या गुप्तरोगांना ती बळी पडते आणि तिच्या संपर्कात येणाऱ्या पुरुषांनासुद्धा त्या रोगाची लागण होते. तसेच कोणत्याही प्रकारची तिची कुटुंबात काळजी घेतली जात नाही. डॉक्टरांकडे नेले जात नाही. कोणताही उपाय तिच्यावर केला जात नाही. घरातील मंडळी तिचे कोणतीची काळजी घेत नसल्यामुळे ती या रोगांना बळी पडते व बेवारस म्हणून मरण पावते.

7. समाजातील हीन वागणूक एक समस्या

देवदासीला समाजात अतिशय हीन स्वरूपाची वागणूक मिळते. आर्थिक बाबींचा अपवाद सोडला तर देवदासी ही समाजासाठी उपभोगाचीच वस्तू आहे, अशी त्यांची धारणा झालेली असते म्हणजे देवदासी ही 'देवदासी म्हणजे देवीसाठी व भोग गावासाठी' अशी मराठी म्हण प्रचलित झाली आहे. मागासलेल्या गरीब जातीतून मोठ्या प्रमाणात देवदासी देवीला (देवाला) सोडण्याची प्रथा आहे. देवदासींचा दर्जा समाजात अतिशय निकृष्ठ समजला जातो. देवदासींचा दर्जा निकृष्ठ होण्यापाठीमागे खऱ्या अर्थाने जबाबदार आहे. अशी सामाजिक शोषणाला ती बळी पडते व शोषणापेक्षा वेश्या व्यवसाय केलेला बरा म्हणून ती या समस्येकडे वळते आणि अनेक समस्यांना ती बळी पडते.

निष्कर्ष

राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले, महर्षी विट्ठल रामजी शिंदे या समाजसुधारकांनी देवदासींना सन्मानाने जगता यावे, यासाठी प्रयत्न केले. काही संस्थांनांनी कायदे करून सुद्धा फारसे यश आलेले नाही. भारत स्वातंत्र्यानंतर काही ठिकाणी देवदासींच्यावरती परिषद घेण्यात आल्या आहेत. म्हणजे प्रतिबंधात्मक व पुनर्वसनात्मक अशा पद्धतीचा विचारा करावा लागणार आहे. परंतु महाराष्ट्र व कर्नाटक शासनाने 1982 ला देवदासी प्रथेविरूद्ध कायदा केला व देवदासींच्या मुलांच्या पुनर्वसनासाठी बेळगाव जिल्ह्यात केंद्र उघडले. देवदासींच्या विकासासाठी अनुदान जाहीर केले. परंतु याची अंमलबजावणी झालेली नाही. किंवा याचे पालन केले जात नाही. थोडीफार पुनर्वसनाचे केंद्रे आहेत. परंतु प्रतिबंधात्मक कायदा अजून केलेला नाही. याची खंत वाटते.

उपाययोजना

- शासनाने 1982 रोजी केलेल्या देवदासी प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.
- देवदासी प्रथा दूर करण्यासाठी अंधश्रद्धा निमुलन समीतीमार्फत उद्‌बोधन वर्ग सुरू करावेत.
- कुंटुंबातूनच मुलींकडे पाहण्याच्या दृष्टिकोन बदलने गरजेचे आहे.
- देवदासींचे पुर्ननिर्मुलन करणे.
- वृद्धापकाळातील पेन्शन योजना राबविणे, इंदिरा आवास योजनेमार्फत घरकूल मिळवून देणे.
- 'हाताला काम व कामाला दाम' मिळण्यासाठी देवदासींना व्यवसायीक प्रशिक्षण देणे.
- समाजानेच अशी प्रथा रोकण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

संदर्भ

संदर्भ

1. डॉ. एन.डी. जत्राटकर, कर्नाटक राज्यातील देवदासी पद्धतीचा समाजशास्त्रीय अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

2. बळवंत कांबळे, देवदासी पोतराज वाघ्यामुरळी – रुप स्वरुप विकृती, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

3. डॉ. साधना झाडबुक्के, देवदासींच्या समस्या, गडहिंग्लज.

4. प्रा. एम.ए. जाधव, देवदासी समस्या व पुर्नवसन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.